राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत तालुका फळरोपवाटिका,राजुरी नवगण, ता.जि. बीड येथील प्रक्षेत्रावरील सुविधाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: फरोवा-२०१९/प्र.क्र.४०/१३-अे,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. २९/३/२०१८.

२) शासन निर्णय क्र. २०१८/४२/प्र.क्र.१३/१३-अे, दिनांक २ फेब्रुवारी, २०१८

३) शासन निर्णय क्र.राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दिनांक २३ फेब्रुवारी,२०१८

४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/फलो-२/रोवा-रा(न)/(शे.दु./दुरूस्ती)/११३/२०१८ दि. २२/१/२०१९.

५) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. फलो/फलो-२/रोवारा(न)/दुरूस्ती/१३१/२०१८ दि. २५/१/२०१९.

६) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-२/रोवा-रा(न)/(दुरूस्ती)/४१७/२०१९ दि. २०/३/२०१९.

प्रस्तावना:-

तालुका फळरोपवाटिका, राजुरी नवगण, ता.जि. बीड येथील प्रक्षेत्रावरील सुविधाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रकास रु.२६,९३,२३५/- (सव्वीस लाख त्र्यान्नव हजार दोनशे पसत्तीस) अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड, यांनी तांत्रीक मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका विकसित करणे अंतर्गत तालुका फळरोपवाटिका, राजुरी नवगण, ता.जि. बीड येथील प्रक्षेत्रावरील पॉटींग हाऊस दुरुस्तीचे अंदाजपत्रकास रु.१,९२,८३२/-(एक लाख ब्यान्नव हजार आठशे बत्तीस) अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड, यांनी तांत्रीक मंजूरी प्रदान केलेली आहे. याप्रमाणे कृषि आयुक्तलयाने सादर केलेल्या एकूण रु.२८,८६,०६७/- (अठ्ठावीस लाख शहाऐंशी हजार सदुसष्ट मात्र) निधीच्या प्रस्तावांच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बाधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिलेली असल्याने व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ (सुधारणा दि.१७/०४/२०१५) भाग-पहिला, उपविभाग ५ अ.क्र. १० परिच्छेद अ. क्र. १३४ नुसार प्रसानिक विभागास दिलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

तालुका फळरोपवाटिका, राजुरी नवगण, ता.जि.बीड येथील प्रक्षेत्रावरील सुविधाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रकास रु.२६,९३,२३५/- (सव्वीस लाख त्र्यान्नव हजार दोनशे पसत्तीस) अंदाजपत्रकास तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका विकसित करणे अंतर्गत

तालुका फळरोपवाटिका, राजुरी नवगण, ता.जि. बीड येथील प्रक्षेत्रावरील पॉटींग हाऊस दुरुस्तीचे अंदाजपत्रकास रु.१,९२,८३२/-(एक लाख ब्यान्नव हजार आठशे बत्तीस) अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी तांत्रीक मंजूरी प्रदान केलेली आहे. याप्रमाणे दोन्ही प्रस्तावाच्या एकत्रित निधीच्या (रु.२६,९३,२३५ + रु.१,९२,८३२ = रु.२८,८६,०६७) रु.२८,८६,०६७/- (अठ्ठावीस लाख शहाऐंशी हजार सदुसष्ट मात्र) प्रस्तावास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, (सुधारणा दि.१७/०४/२०१५) भाग-पहिला,उपवि १०.क्र.अ ५ परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये प्रशासकीय मान्यता खालील अटीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिके मधील प्रशासकीय मान्यता देण्याच्या नियमांच्या व तद्अनुषंगिक नियमांचे अनुपालन करण्यात यावे.
२) दुरुस्तीचे काम विहित निविदा पध्दती अवलंबून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत, संबंधित प्रशासनिक विभागाकडे कार्यकारी अभियंता किंवा त्यावरील दर्जाचे पद असल्यास प्रशासनिक विभागांमार्फत कंत्राटदाराची नेमणूक करुन करण्यात यावे.
३) अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध असली पाहिजे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९१६१२१३०६२६०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.09.16 12:19:38 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. विभागीय कृषी सहसंचालक,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,बीड.
५. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
६. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
७. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. सहसंचालक लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई -३२,
९. अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प),कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन)विभाग,मंत्रालय, मुंबई.-३२.
११. निवड नस्ती (१३-अे).